मुख्यमंत्री कृषि व अन्न प्रक्रिया योजना सन २०१८-१९ करिता पहिला हप्ता अनुदान रुपये ३२५.९७५ लाख रक्कम वितरित करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
कृषि,पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग
शासन निर्णय क्रमांक: अप्रयो-२०१८/प्र.क्र.२२२/९-अे
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय विस्तार, मुंबई ४०० ०३२.
दिनांक:- २६ मार्च, २०१९

संदर्भ- (१) शासन निर्णय, कृषि व पदुम विभाग क्र. राअअ-१११६/प्र.क्र.२४८/१४-अे, दिनांक २० जून, २०१७
(२) शासन निर्णय, कृषि व पदुम विभाग क्र. कृप्रधो-२०१७/प्र.क्र.२०८/९-अे, दि.३१ ऑक्टोबर, २०१७
(३) शासन परिपत्रक, वित्त विभाग क्र: अर्थसं-२०१८/प्र.क्र.६९/अर्थ-३, दिनांक ०२.०४.२०१८
(४) शासन निर्णय, कृषि व पदुम विभाग क्र. राअअ-२०१८/प्र.क्र.१७९/९-अे, दि.२० जून, २०१८
(५) संचालक (कृषि प्रक्रिया व नियोजन), कृषि आयुक्तालय, पुणे यांचे जा.क्र. कृआ/कृप्र/मुकृवअप्र/ अनु मागणी/२८९/२०१८, दिनांक १२/१०/२०१८
(६) शासन परिपत्रक, वित्त विभाग, क्र. अर्थसं-२०१८/प्र.क्र.६९/अर्थ-३, दि.२५ जानेवारी, २०१९
(७) शासन निर्णय, कृषि व पदुम विभाग क्र. अप्रयो-२०१८/प्र.क्र.२२२/९-अे, दिनांक ०५ फेब्रुवारी, २०१९
(८) शासन निर्णय, कृषि व पदुम विभाग क्र. मुअप्र-२०१८/प्र.क्र.२३/९-अे, दिनांक १ फेब्रुवारी, २०१९
(९) कृषि संचालक (कृषि प्रक्रिया व नियोज), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र ६ राज्य पुणे यांचे जा.क्र. कृप्रवनि/मुमंकृवअयो/अनु.मागणी/२६६/२०१९, दिनांक १५ मार्च, २०१९

प्रस्तावना :-

राज्यामध्ये सन २०१७-१८ या आर्थिक वर्षापासून "मुख्यमंत्री कृषि व अन्न प्रक्रिया योजना" ही नवीन १०० % राज्य पुरस्कृत योजना पुढील पाच वर्षाकरिता राबविण्यास दिनांक २० जून, २०१७ च्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली आहे. सन २०१८-१९ मध्ये सदर योजनेच्या अंमलबजावणीकरिता रुपये ५००० लाख (रुपये पन्नास कोटी फक्त) ची तरतूद अर्थसंकल्पित करण्यात आली असून संदर्भाधीन क्रमांक ४ येथील दिनांक २० जून, २०१८ च्या शासन निर्णयान्वये प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. सदर योजनेंतर्गत पहिल्या हप्त्याचा रुपये ३२५.९७५ लाख एवढा निधी वितरित करण्याची विनंती कृषि संचालक (कृषि प्रक्रिया व नियोजन), कृषि आयुक्तालय, पुणे यांनी त्यांच्या संदर्भाधीन क्रमांक ९ च्या पत्रान्वये केली आहे. त्यास अनुसरुन शासन पुढीलप्रमाणे निर्णय घेत आहे..

शासन निर्णय :-

आयुक्त (कृषि), कृषि आयुक्तालय, पुणे यांचे कार्यालयाकडून निधीची मागणी केल्यानुसार सन २०१८-१९ मध्ये "मुख्यमंत्री कृषि व अन्न प्रक्रिया" योजनेच्या अंमलबजावणीसाठी आयुक्त (कृषि) यांना अर्थसंकल्पीय वितरण प्रणालीद्वारे पहिला हप्ता रुपये ३२५.९७५ लाख (रुपये तीन कोटी पंचवीस लाख सत्त्यान्नव हजार पाचशे फक्त) उपलब्ध करुन देण्यात येत आहे.

२. या शासन निर्णयान्वये वितरित केलेला निधी खालील लेखाशीर्षाखाली अर्थसंकल्पीय तरतूदीतून खर्ची टाकावा.

"मागणी क्र. डी-३,
२४०१ पीक संवर्धन,
(००) (१०२) अन्नधान्य पीके,
(००) (३४) मुख्यमंत्री कृषि व अन्न प्रक्रिया योजना (१०० % राज्य योजना)
(२४०१ A ७९१)
३३, अर्थसहाय्य".

३. सदर योजना राबविताना यापूर्वी निर्गमित केलेल्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार कार्यवाही करावी.

४. हा शासन निर्णय वित्त विभागाचे परिपत्रक क्रमांक: अर्थसं-२०१८/प्र.क्र.६९/अर्थ-३, दिनांक २ एप्रिल, २०१८ व दिनांक २५ जानेवारी, २०१९ मधील अटी व शर्तीचे अनुपालन करण्याच्या अधीन राहून प्रशासकीय विभागास प्रदान केलेल्या अधिकारानुसार निर्गमित करण्यात येत आहे.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक क्र. २०१९०३२६११३३०७४५०१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

Digitally signed by Ashok Maroti Atram
Date: 2019.03.26 11:38:02 +05'30'

(अशोक आत्राम)
सह सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१) मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव.
२) मा. मंत्री (कृषि व फलोत्पादन) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
३) मा. राज्यमंत्री (कृषि व फलोत्पादन) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
४) मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई-३२.
५) मा. सचिव (कृषि) यांचे वरीष्ठ स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई.
६) आयुक्त (कृषि), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य,पुणे (५ जादा प्रतीसह)
७) संचालक (कृषि प्रक्रिया व नियोजन), कृषि आयुक्तालय,महाराष्ट्र राज्य,पुणे
८) सर्व विभागीय कृषि सहसंचालक, महाराष्ट्र राज्य
९) सर्व जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी, महाराष्ट्र राज्य
१०) सर्व जिल्हा कोषागार अधिकारी,
११) महालेखापाल,महाराष्ट्र-१/२ (लेखा परीक्षा/ लेखा अनुज्ञेयता),मुंबई/नागपूर.
१२) निवड नस्ती (का.९ अे)
१३) कार्यासन ९-अे, संग्रहार्थ.